प्रेसनोट दि.२४.१०.२०१९

<u>शिर्षक</u> :- माणिकनाळ ग्रामपंचायत कार्यालय, ता. जत येथील श्री. भिमाशंकर मल्लान्ना मेडेदार, ग्राम रोजगार सेवक यांना ५,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | पुणे परिक्षेत्र, सांगली युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | उमदी पोलीस स्टेशन, गुरनं १९४/२०१९ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८(सुधारीत २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | भिमाशंकर मल्लान्ना मेडेदार, वय ३६ वर्षे, ग्राम रोजगार सेवक, ग्रामपंचायत कार्यालय, माणिकनाळ, वर्ग -इलोसे |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५,०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांचे वडीलांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घर बांधणीकरीता १,२०,०००/- रुपये इतके अनुदान मंजुर झालेले आहे. त्यातील दोन हप्त्याचे बिल आत्तापर्यंत तक्रारदार यांचे वडीलांचे नांवे बँक खात्यावर जमा झाले आहे. पुढील दोन हप्त्याचे बिल मंजुर करुन देण्यासाठी श्री. भिमाशंकर मल्लान्ना मेडेदार, ग्राम रोजगार सेवक, ग्रामपंचायत माणिकनाळ, ता. जत यांनी तक्रारदार यांचेकडे पांच हजार रुपये लाचेची मागणी केलेबाबत तक्रारदार यांनी दि. २२.१०.२०१९ रोजी इकडील कार्यालयात येवुन तक्रारी अर्ज दिला होता.<br>तक्रारदार यांनी दिले तक्रारीनुसार दि.२३.१०.२०१९ रोजी केले पडताळणीमध्ये लोकसेवक भिमाशंकर मल्लान्ना मेडेदार यांनी तक्रारदार यांचेकडे प्रथम ५,०००/- रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यानंतर लागलीच माणिकनाळ ग्रामपंचायत कार्यालयाचे समोर सापळा लावला असता श्री. भिमाशंकर मल्लान्ना मेडेदार यांनी तक्रारदार यांचेकडे ५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन सदरची लाचेची रक्कम स्विकारली असता भिमाशंकर मल्लान्ना मेडेदार, ग्राम रोजगार सेवक यांना लाच रक्कम स्विकारले असता रंगेहात पकडण्यात आले असुन त्यांचे विरुध्द उमदी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबेंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.शी संपर्क करावा.**

संपर्क पत्ता :- पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, बदाम चौक, सांगली ,४१६४१६
संकेत स्थळ :- **acbmaharashtra.gov.in**
ई-मेल :- **acbwebmail@mahapolice.gov.in**
ऑनलाईन तक्रार ॲप :- **acbmaharashtra.net**
दुरध्वनी क्रमांक :- ०२३३,२३७३०९५ टोल फ्री क्रमांक :- १०६४
व्हॉट्सॲप क्रमांक :- ९८२३६१८००१